# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web: www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/२०१६-१७/ 3821 दिनांक : 07 SEP 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठामधील विभाग ज्यामध्ये विनाअनुदानित अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.टीईएम/प्र.क्र२१९/तांशि-४, दि.३१/०३/२०१६.
२) तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र.१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी-ऑनलाईन-फॉर्म भरणे/२०१६-१७/८२, दिनांक २९/०८/२०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतना समवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/शासकीय विद्यापीठ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असणाऱ्या ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क "शासकीय अथवा शासन अनुदानित संस्था" किंवा शासकीय विद्यापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क हे **"शिक्षण शुल्क समितीदवारे"** ठरविण्यात येते सदर संस्थांचे **"शिक्षण शुल्क शिक्षण नियामक प्राधिकरणा"** कडून निश्चित करणे आवश्यक राहील. अशा संस्थांमधील केंद्रिय प्रवेश प्रक्रियेदवारे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर E.B.C. Concession येथे संस्थातील विद्यार्थ्यांने माहिती भरावयाची आहे.

त्यानुसार सर्व संस्थांनी खालीलप्रमाणे सदर बाबतीत संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन अर्ज भरुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांना जागृत करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :

१) विद्यार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावीत.
२) याबाबतीतील सर्व सूचना/परिपत्रक सूचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावे.
३) सदर सूचना सर्व विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये शिक्षकांमार्फत वाचण्यात यावी व संबंधीत शिक्षकांनी ती वाचून दाखविल्याबाबत लेखी नोंद ठेवावी. तसेच एसएमएस सुविधा असल्यास विद्यार्थ्यांना अंतिम दिनांकापर्यंत एसएमएस व्दारे जागरुक करावे.
**४) विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन अर्जाची माहिती दिनांक २९/०८/२०१६ ते १५/०९/२०१६ पर्यंत भरावी.**

त्यानंतर संस्थांनी अर्जाची संपूर्ण छाननी करुन त्याबाबतची माहिती/आकडेवारी या कार्यालयास **२० सप्टेंबर २०१६ पर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत** न चुकता सादर करावी.

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांना/विद्यापीठे यांना अडीअडचणी उदभवल्यास desk3@dtemaharashtra.gov.in या (इमेल) व दूरध्वनी क्रमांक **०२२ ३०२३३४६८/४३५** यावर संपर्क साधावा.

आपल्या संस्थेतील कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित रहाणार नाही याची दक्षता घ्यावी. जर विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख म्हणून आपली राहील.

डॉ. दि. रा. नंदनवार
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

प्रत : १) प्रोग्रामर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.
२) माहितीसाठी कार्यासन क्र.१५, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.